# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

चांदवड जि. नाशिक

सुरक्षितता, विश्वासार्हता, आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## संचालक मंडळ

संस्थापक :- श्री. प्रा. निकम टी. पी.

| | |
|---|---|
| श्री. डॉ. अरूण पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| सौ. रेखा विलासराव महाजन | व्हा. चेअरमन |
| श्री. तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री. देविदास त्र्यंबकराव शेलार | संचालक |
| श्री. निवृत्ती दामोदर निकम | संचालक |
| श्री अरूण शंकरराव सोनवणे | संचालक |
| श्री. नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री. दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| श्री. अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री. दगाजी रामचंद्र बच्छाव | संचालक |
| श्री. रामदास सदाशिव साळवे | संचालक |

## कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री. विलास पंडीतराव आहेर | मॅनेजर |
| श्री. गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| सौ. रूपाली नरेंद्र कोतवाल | लिपीक |
| श्री. सतिश मुरलीधर आहेर | शिपाई |

## कायदेशीर सल्लागार

ॲड. श्री. शिवाजीराव महादु सोनवणे

## चार्टर्ड अकौटन्ट

श्री. एस डी. ठाकरे

## वाहन व्हॅल्युअर

श्री. अभयकुमार आर. मेहता , मालेगाव

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

## चांदवड जि. नाशिक

## सन २००८ - २००९ चा वार्षिक अहवाल

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

सस्नेह नमस्कार ......

आज ८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो. दि. ३१/०३/२००९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून जे मोलाचेसहकार्य केले. ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेवुन संस्थने कठीण निकष लावुन कर्जवाटप, कर्ज वसुली व दैनंदिन काम केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ५ वर्षे "अ तारांकीत" ऑडीट वर्ग मिळालेला आहे .तर ८ वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वतःच्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणकी- -करणासह सुसज्ज अवस्थेत आज आपण पाहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे इवलेसे रोपटे अवघ्या ८ वर्षात त्याचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत. म्हणून चांदवड तालुक्यातील एक अग्रगण्य संस्था म्हणून महात्मा फुले नागरी सह. पतसंस्थेला ओळखले जाते. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. म्हणून संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत व नाव लौकीकात आपला मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे. त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी व महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, व्यावसायिकांना कर्जवाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९६% कर्ज वसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

दरवर्षी वाढता नफा , वाढते कर्ज वाटप , लवाद दाखल न करता होणारी कर्ज वसूली, वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेने दि. ३१/०३/२००६ रोजी ८,५८,३७५=०० रूपयाची वास्तु खरेदी केली होती, आणि गेल्या वर्षी संस्थेने इंटिरियर डिझाईन साठी ४,६९,१२५=०० रूपये खर्च केले तर सुकॅम कंपनीचे इनव्हर्टर साठी ६५,९००=०० रूपये खर्च केला होता. स्पर्धेच्या युगात व आवश्यकतेची निकड लक्षात घेवून संस्थेने संपूर्ण कार्यालयीन कामकाजासाठी संगणकीकरण प्रणाली सुरू केलेली आहे. संस्था वातानुकूलीत करण्यासाठी दोन ए. सी. बसविण्यासाठी ६२,०८०=०० रूपयांची मंजूरी घेतली त्यापैकी एक ए. सी. बसविण्यात आलेला आहे. आज "महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था" ही अंतर - बाहय सुंदर व सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे

मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी. पी. यांच्या स्वप्नांना मुर्त रूप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी. पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे पडावे यासाठी मी आपणासमोर संस्थेच्या हिताची भावी योजना मांडणे पसंद करेल. संस्थेला एका सभागृहाची नितांत गरज आहे. आपण सर्वांनी ठरवले तर काम कठीण असले तरी अशक्य नाही असे मला वाटते. दोन वर्षापासून टॅक्स ऑडीटच्या कठीण परीक्षेतून जावून देखील आपल्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. संस्थेने उपविधित दुरूस्ती करून कार्यक्षेत्रात वाढ करून चांदवड कार्य-क्षेत्र केले आहे. तसेच कर्जवाटपाची मर्यादा आता १०,००,०००=००रूपयांपर्यंत केली आहे. अजूनही बरेच काही करावयाचे आहे. विविध योजना आहे. त्यासाठी आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा ह्रदयाशी बाळगून ८वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

## भागभांडवल :-

संस्थेचे अधिकृत भागभांडवल २५,००,०००=००रूपये असून दि. ३१/०३/२००८ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या २६२ असून वसूल भागभांडवल १०,०२,३००=०० रूपये आहे .अहवाल सालात भाग भांडवल रूपये १,२७,९४४=०० ने वाढ झालेली आहे.

## राखीव व इतर निधी :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण स्वनिधी वरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि. ३१/०३/२००९ अखेर संस्थेचा निधी रूपये ३३,७८,७३१=०० असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये ८,६८,०३५=०० ने वाढ झालेली आहे.

## ठेवी :-

संस्थेचे उत्कृष्ट कामकाज व संस्थेवर दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. अहवाल वर्षात ठेवीमध्ये रूपये ८६,०१,३५४=०० वाढ झालेली असून या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ३,१५,८४,०७९=०० इतक्या आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छितो.

## कर्ज वाटप :-

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार मजूर इत्यादी सर्व गरजू व होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज

वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची क्षमता, त्याची विश्वासार्हता व गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये १,२९,७६,००३=०० इतके कर्ज वाटप केलेल आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्जवाटपात रूपये ३०,९६,०५६=०० ने घट झालेली आहे.

**थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थांच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. परंतु कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि. ३१/०३/२००९ अखेर संस्थेने ९६% इतकी कौतुकास्पद कर्जवसुली केली आहे. कोणत्याही सभासदावर आपण कठोर कारवाई केलेली नाही. यावर्षी १००%कर्जवसूली करून निरंक थकबाकी करण्याचा मानस आमचा आहे. त्यासाठी सर्व सभासदांनी सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. मागील दोन वर्षापासून एन.पी.ए.लागू झालेला नाही. एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण १.०४% इतके आहे.

**गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी.रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रूपये १,५१,८९,८५७=०० रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला ४,२५,३४७=१० रूपयांचा निव्वळ नफा झालेला आहे .सदरच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहे प्रतिवर्षीवाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .

**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम ,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ४ कर्मचारी वर्ग लाभलेले आहे .संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे .संस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते .म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

लेखा परिक्षण :-

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते संस्थेला गेली ५वर्षापासुन सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळत होता परंतु मागील वर्षात कामकाजातील किरकोळ त्रुटींमुळे ५० गुण कमी मिळाले त्यामुळे संस्थेला प्रथमच'अ' ऑडीट वर्गावर समाधान मानावे लागले. संस्थेने पुन्हा एकदा उत्कृष्ट कामकाज करून 'अ तारांकित' वर्ग मिळविण्यासाठी कंबर कसली आहे.

सामाजिक बांधिलकी :-

संस्थेने मार्च महिण्यात महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेला कार्यक्रम " **प्रभावी बोलाल तरच जिंकाल** " या कार्यक्रमाचे ७ दिवसांचे आयोजन केले होते कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्येते **श्री. विजय बनकर** यांनी ५० लोकांचे सलग प्रशिक्षण घेतले. त्याच प्रमाणे संस्थेने वेळोवेळी सामाजिक ,शैक्षणिक, अध्यामिक क्षेत्रात अत्यंत उत्साहाने अग्रस्थानी राहुन कार्यक्रम घेतले आहे.

आभार :-

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे . त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो .मा. सहाय्यक निबंधक देशपांडे साहेब, सहकार व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी , श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. ठाकरे एस डी (सी. ए.), संस्थेचे वाहन फ्लॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार , राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदशन केले , भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(श्री. डॉ. अरूण निकम)
चेअरमन

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

### ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२००९ अखेर

| गा. वर्षी | देणी | | गा. वर्षी | मालगत्ता | |
|---|---|---|---|---|---|
| | इतर येणे | | ३३३३३.४० | रोख शिल्लक | २३३५२७.१ |
| २०२३६३.०० | येणे व्याज | ०.०० | | बँक | |
| | भागभांडवल | | ६७३६९७.०० | एन डी सी सी बँक चालू (करंट) | १८३७९०१.० |
| ८७४३५६.०० | सभासद भागभांडवल | १००२३००.०० | १५७९५.०० | एन डी सी सी बँक सेव्हींग खाते | २८४४०५७.० |
| | ठेवी | | २३१०.०० | नामको बँक चालू खाते (शाखा चांदवड) | ३१४२३०.० |
| २१०३८६५७.०० | मुदत ठेव खाते | २१२०५३४२.०० | ९२५११.०० | बँक चालू खाते (स्टेट बँक) | ६५८२५.० |
| ७०८९६०.०० | अल्पबचत ठेव खाते | २९९८५०.०० | .०० | वि चांदवड मर्चन्टस बँक चालू खाते | ८५९३९२.० |
| ८२४१५५.०० | बचत ठेव खाते | ५०७२८१४.०० | | गुंतवणूक | |
| ३७३०००.०० | दामदुप्पट ठेव | ४३९६८९.०० | ३३५२५५०.०० | एन डी सी सी बँक मुदत ठेव खाते | ८७३८०००.० |
| ३७९५३.०० | सुरक्षा ठेव खाते | २७६९३.०० | १५०१०००.०० | नामको बँक मुदत ठेव (चांदवडशाखा) | १५०१०००.० |
| .०० | ज्येष्ठ नागरिक सुविधा | ४०७७०६२.०० | २९०००००.०० | स्टेट बँक (शाखा चांदवड) मुदत ठेव | २९०००००.० |
| .०० | जेष्ठ नागरिक सुविधा | ४६१६२९.०० | १००००.०० | लॉकर डिपॉझिट चामको बँक चांदवड | २०३५०.० |
| | निधी | | ४१८००२.०० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बँक | ५२२२७४.० |
| ४२३८८२.०० | राखीव निधी | ५२७१५४.०० | ५४९०.०० | बँक इमारत फंड एन डी सी सी बँक | ५६८३.० |
| १३२२३००.०० | इमारत निधी | १४९२४३९.५० | .०० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | ५००.० |
| १४५१.०० | सभासद लाभांश समिकरन | १४५१.०० | .०० | महा. राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | १०००.० |
| ४९२६४.०० | सभासद कल्याण निधी | ८३६५०.०० | .०० | नाशिक जि मध्य. सह बँक लि नाशिक ई | १०५०.० |
| ८१७४५.५० | विमा निधी | ११२१८४.५० | .०० | स्टेट बँक मुदत ठेव शाखा वडाळीभोई | १५०००००.० |
| १८३४१२.०० | झिज फंड | ३५०१६६.०० | | कर्ज | |
| २५३४२.०० | संशयीत व बुडित कर्ज निधी | २५३४२.०० | २१७१७१५.०० | वैयक्तीक कर्ज | २०२८४६४.० |
| २८८१५.०० | बोर्ड व स्टाप ट्रेनिंग फंड | २७८४०.०० | ४०६५९२९.०० | हायरपर्चेस कर्ज | ३३०७२१३.० |
| ४६९१२५.०० | फर्निचर निधी | ४६९१२५.०० | ४८९७५९१.०० | मॉरगेज कर्ज | ३६८१७१६.० |
| ५३६५.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | १०१००.०० | १८७१८०२.०० | नजरगहाण कर्ज | ६५६६५९.० |
| २३३७५.०० | कॉम्प्युटर निधी | १५१३००.०० | १५९२१५१.०० | सोने चांदी तारण कर्ज | १३२५०३८.० |
| .०० | इनव्हर्टर निधी | ६५९००.०० | २५७०००.०० | मुदत ठेव ॲडव्हान्स | ५५४७००.० |
| .०० | ए. सी. निधी | ६२०८०.०० | १८९४००.०० | अल्पबचत ॲडव्हान्स | ५०७००.० |
| | देणी व तरतूद | | १०२६४७१.०० | गृहतारण कर्ज | १३७१५१३.० |
| २०८७२.०० | ऑडिट फी देणे | २३८५२.०० | | इतर येणे | |
| ५०००.०० | शिक्षण निधी देणे | ५०००.०० | २०००.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.० |
| ६४१११.५० | व्याज देणे | १२८२२३.०० | ५०००००.०० | गुंतवणूकिवरील येणे व्याज | ६०८०९२.० |
| ५००.०० | व्यवसाय कर देणे | ०.०० | | कायम मालमत्ता | |
| ५०००.०० | आयकर तरतूद | ५०००.०० | ८५८३७५.०० | इमारत | ८५८३७५.० |
| ३००००.०० | एन पी ए तरतूद | ३००००.०० | | डेडस्टॉक | |
| ३६५.०० | अनामत खाते | १३८५.०० | ७६१३१५.०० | डेडस्टॉक खाते | ८०९५१६.० |
| ८७५०.०० | विमा अनामत खाते | १६४५०.०० | | लायब्ररी | |

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२००९ अखेर

| मा. वर्षी | देणी | | मा. वर्षी | मालमत्ता | |
|---|---|---|---|---|---|
| ४०३.०० | टि.डि.एस.देणे खाते | ०.०० | १५९३.०० | लायब्ररी खाते | १५९३.० |
| ३९१५०८.४० | एकूण नफा | ४२५३४७.१० | | | |
| २७२०००३०.४० | | ३६६००३६८.१० | २७२०००३०.४० | | ३६६००३६८.१ |

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

### नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२००९ अखेर

| मा. वर्षी | खर्च | | मा. वर्षी | उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| | <u>बॅक चार्जेस</u> | | | <u>इतर उत्पन्न</u> | |
| ३०.०० | बॅक चार्जेस | १००.०० | ४०१५.०० | नोटीस खर्च जमा | १७६८८.६ |
| १२८.०० | बॅक चार्जेस | १७१८.०० | ५२५३.०० | अल्पबचत कमिशन खाते (उत्पन्न) | २६३३.० |
| | <u>इतर खर्च</u> | | | <u>व्याज उत्पन्न खाते</u> | |
| २०६०.०० | सेवक सानुग्रह अनुदान | ११८२०.०० | १९९७०.०० | अल्पबचत ॲडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न | ७५१७.० |
| .०० | सामाजिक कार्यकम खर्च | ६९६१.०० | १५८१८८.०० | गृहतारण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | १७१६०७.० |
| ८७५९.०० | पोस्टेज व टेलिफोन खर्च | १४४१६.०० | ३०९५९९.०० | वैयक्तीक कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ३८५७५६.० |
| १०००.०० | लॉकर भाडे | ३०००.०० | ५५१६८१.०० | हायरपर्चेस कर्जावरील व्याज जमा (उत्पन | ६६०२४९.० |
| १३०००.०० | ऑडिट फि खर्च | २५०००.०० | ४३६२६४.०० | मॉरगेज कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ६४२८७१.० |
| १६१९६८.०० | घसारा खर्च | १६६७५४.०० | २३६७७६.०० | नजरगहाण कर्जावरील व्याज जमा (उत्पन | २५२४५४.० |
| ५००.०० | ऑफिस भाडे खर्च | ०.०० | १९०९१४.०० | सोनेचांदी कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ५३६२८९.० |
| २५६३०.०० | स्थलांतर सोहळा खर्च | ०.०० | ५३३३६.०० | मुदत ठेव अडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न) | ३७३८२.० |
| ३८६२५.०० | प्रिंटिंग व स्टेशनरी | १३६४७.०० | | <u>गुंतवणूकिवरील व्याज</u> | |
| ३८८३६.१० | किरकोळ खर्च | ५३९७७.०० | ६८६३०६.०० | गुंतवणूकिवरील व्याज खाते | ५०१९५४.० |
| १०५३०.०० | लाईट बिल खर्च | १३०९०.०० | | <u>अल्पबचत स्टेशनरी</u> | |
| ३३०.०० | प्रवास खर्च | ६००.०० | ८८०.०० | अल्पबचत स्टेशनरी जमा | २७०.० |
| २३१०४.५० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १८२३३.०० | | <u>डि.डि.कमिशन</u> | |
| २१५१.०० | इमारत दुरूस्ती खर्च खाते | ०.०० | ५८३४.०० | डि.डि.कमिशन | ४४३८.० |
| २०३००.०० | जाहिरात खर्च खाते | २१५००.०० | | | |
| ५५००.०० | निवडणूक खर्च | ०.०० | | | |
| ४९००.०० | चंबकीय उपचार शिबीर खर्च | ०.०० | | | |
| ५००.०० | व्यवसाय कर खर्च | ५००.०० | | | |
| १००४.०० | फर्निचर दुरूस्ती खर्च खाते | ०.०० | | | |
| ३५००.०० | शिक्षण निधी खर्च | ५०००.०० | | | |
| ९७१९५.०० | अल्पबचत कमिशन खाते (खर्च) | ३९२६२.०० | | | |
| | <u>व्याज खर्च खाते</u> | | | | |
| २८९१२.०० | बचत ठेवीवरील व्याज खर्च | ७१३२८.०० | | | |
| ३६५७०.०० | अल्पबचत ठेवीवरील व्याज खर्च | १५५९३.०० | | | |
| १४२९०४.०० | दामदुप्पट ठेवीवरील व्याज खर्च | ४७५००.०० | | | |
| ३६६२.०० | गुंतवणूक ॲडव्हान्सवरील व्याज खर्च | ०.०० | | | |
| १४७०३०९.०० | मुदत ठेवीवरील व्याज खर्च | २१२२८१२.५० | | | |
| | <u>पगार खाते</u> | | | | |
| १२५६००.०० | पगार खाते | १४२२००.०० | | | |
| | <u>सशस्त्र सेना ध्वजदिन २००७ निधी</u> | | | | |
| .०० | सशस्त्र सेना ध्वजनिधी २००७ निधी | ७५०.०० | | | |

महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२००९ अखेर

| मा. वर्षी | खर्च | | गा. वर्षी | उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| ३९१५०८.४० | ताळेबंद कडे एकूण नफा | ४२५३४७.१० | | | |
| २६५९०१६.०० | | ३२२११०८.६० | २६५९०१६.०० | | ३२२११०८.६ |